## निवडक

### वळवई येथील शांतादुर्गा देवस्थानात आजपासून विविध कार्यक्रम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे दि. १९** : सातेरीभाट – वळवई येथील श्री शांतादुर्गा देवस्थानच्या शिमगोत्सव प्रित्यर्थ गुरुवार दि. २० ते शनिवार दि. २२ रोजीपर्यंत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

गुरुवारी सकाळी देवस्थानात धार्मिक विधी, श्रीस अभिषेक, रात्री ८ वाजता सुवारी वादन, ९ वाजता श्रींची पालखीतून मिरवणूक, आरती, तीर्थप्रसाद, १० वाजता 'रायगडाला जेव्हा जाग येते' हा ऐतिहासिक नाट्यप्रयोग होईल.

शुक्रवारी दि. २१ रोजी रात्री १० वाजता 'फॅमिली लयभारी' हा मराठी विनोदी नाट्यप्रयोग होईल. शनिवारी दि. २२ रोजी सकाळी १० वाजता सुवारी वादन, दुपारी १२ वाजता गुलालोत्सवाने शिमगोत्सवाची सांगता होणार आहे. तरी सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे देवस्थान समितीतर्फे कळविण्यात आले आहे.

---

### मेणकुरे येथे शिगमोत्सवानिमित्त २३ पासून नाटकांची मेजवानी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. १९** : मेणकुरे येथील श्री चव्हाटेश्वराच्या भव्य रंगमंचकावर शिगमोत्सवानिमित्त या वर्षीचे पलटदार व व्यवस्थापक मोहन शंकर परब, सुभाष शंकर परब तसेच सिद्धेश आत्माराम परबद्वारे नाटकाचे आयोजन केले आहे.

रविवार दि. २३ रोजी मेणकुरे ज्येष्ठ क्रिकेट संघ निर्मित शिवकालीन छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित तसेच विनोद चंद्रकांत शेडगे लिखीत अशोक भटाळे निर्मित व दिग्दर्शीत तीन अंकी ऐतिहासिक नाटक 'स्वप्न भंगले रायगडाचे' सादर केले जाईल.

या नाट्य प्रयोगाचे संगीत दिग्दर्शक –प्रदीप शिलकर, तबला – सूर्या शेट्ये, पार्श्वसंगीत – सत्यवान नाईक, ध्वनी संकलन– नरेश नाईक, रंग भूषा – काशिनाथ खलप, छायाचित्रण– प्रमोद खानोलकर (सोहम संगीत), रंगमंच प्रकाश योजना – सोपटे रंगमंच – पार्से पेडणे गोवा आदी आहेत.

यात सीताराम नाईक, सुदेश नाईक, नारायण सळ, लक्ष्मण (आपा) नाईक, संदेश परब, उत्कर्षा रेवाडकर, किरण कांदोळकर, राघोबा शेट्ये, अनिल शेट्ये, प्रमोद नाईक, रितेश मांद्रेकर, हेमंत नाईक, अमेय नाईक, प्रथमेश परब, रोनक परब, उत्कर्ष परब, रोहित अंदुर्लेकर, सार्थक सावळ आदी कलाकार सहभागी होणार आहेत.

सोमवार दि. २४ रोजी माननीय आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये निर्मित प्राध्यापक कै. वसंत कानेटकर लिखित पंढरीनाथ नाईक दिग्दर्शीत महाभारत पूर्वार्थवर आधारित तसेच पितामह भीष्म यांची प्रतिज्ञा आणि संगीत नाट्य क्षेत्राला वरदान ठरलेलं व दि गोवा हिंदू असोसिएशन ने अजरामर केलेलं नाटक मत्स्यगंधा टसादर होणार आहे.

प्रस्तुती श्री माऊली प्रासादिक नाट्य मंडळ मेणकुरे त्रिवेणी संगम, मूळ संगीत दिग्दर्शक – पंडित जितेंद्र अभिषेकी, ऑर्गन – दत्तराज सुर्लकर ,तबला – संकेत खलप ,ध्वनी संकलन – सुभाष शिरोडकर (बांदा), रंगमंच/प्रकाश योजना – गुरुप्रसाद रंगमंच – कासारपाल गोवा, रंगभूषा – नीलकंठ खलप आदी आहेत. यात चिन्मय जोगळेकर (पुणे), ह भ प माऊली विष्णू गवस, प्रताप उगवेकर, सत्यवान वासू गाड, देविदास राऊत, राजेश नाईक, शारदा शेटकर, सोनिया शेट्ये हे कलाकार सहभागी होणार आहेत.

# वाचनातून स्मरणशक्ती, आत्मविश्वास वाढतो

## सुलक्षणा सावंत | डिचोलीत 'माझे पुस्तकं' उपक्रमाचे उद्घाटन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १९** : लहान मुलांमध्ये वाचन व लेखनाची गोडी निर्माण करून चांगले संस्कार निर्माण करणार आहे. वाचन व लेखन संस्कृती पूढे नेण्यासाठी माझे पुस्तक अत्यंत लाभदायक ठरणार असू न हा उपक्रम पालक व शिक्षकांनीही आपल्या खांद्यावर घेत मुलांमध्ये प्रोत्साहन निर्माण करण्याचा ध्यास घ्यावा. पुस्तक वाचनातून आमच्या बौध्दिक मानसिक व सामाजिक विकासात भर पडते. आपली एकाग्रता, ज्ञानशक्ती, स्मरणशक्ती, आत्मविश्वास, कल्पनाशक्ती अशा अनेक गोष्टी वाचनातून वाढत असतात. वाचनाला वयाची मर्यादा नसते, म्हणूनच विद्यार्थ्यांबरोबरच पालकांचीही मोठी जबाबदारी आहे, असे प्रतिपादन पद्मिनी फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सुलक्षणा सावंत यांनी डिचोली येथे केले.

डिचोली येथील छत्रपती शिवाजी महाराज सरकारी प्राथमिक विद्यालय पालक शिक्षक संघ, गोवा समग्र शिक्षा अभियान व रवींद्र भवन साखळी यांच्या संयुक्त विद्यमाने माझे पुस्तक या मुलांमध्ये वाचन व लेखन कौशल्य निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाचे उद्घाटन पद्मिनी फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सुलक्षणा सावंत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी शिक्षण संचालक शैलेश झिंगडे, डिचोली तालुका भाग शिक्षणाधिकारी लीना कळंगुटकर, साखळी रवींद्र भवनचे संचालक रविराज च्यारी, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष आशिष गोवेकर, छत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक



**डिचोली : 'माझे पुस्तक' उपक्रम कार्यक्रमाचे उद्घाटन करताना सुलक्षणा सावंत. सोबत शैलेश झिंगडे, रंजना लाड, आत्माराम गावकर, आशिष गोवेकर, रविराज च्यारी व गणेश गावडे.**

विद्यालयचे मुख्याध्यापक श्रीगणेश गावडे, शिक्षणतज्ज्ञ आत्माराम गावकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रंजीता लाड आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

आपण आपल्या पालक व शिक्षकांकडून, वातावरणातून, आमच्या समवयीन सहकाऱ्यांकडून व स्वतःकडून शिकत असतो. हे सर्व करत असतानाच आपणाकडून काहीतरी नावीन्यपूर्ण होण्यासाठी आपण प्रयत्नशील रहावे. माझे पुस्तक हा उपक्रम दि. १८ मार्च ते दि. १८ जूनपर्यंत म्हणजेच गोवा क्रांती दिनापर्यंत चालणार असून यातून डिचोली तालुक्यात वाचन व लेखनाची क्रांती घडणार, असाही विश्वास सुलक्षणा सावंत यांनी व्यक्त केला.

शिक्षण संचालक शैलेश झिंगडे यांनी, मुलांना आवडीनुसार वाचनासाठी मजकूर द्यावा. हे कार्य अवघड असले तरी मुलांना काय आवडते याची पारक पालकांनी करून त्यांना वाचनाची गोडी द्यावी. हा उपक्रम अत्यंत उत्कृष्ट असून तो या तालुक्यातून सुरू होऊन संपूर्ण गोव्यात पोहोचला पाहिजे. ज्ञान व माहिती यात फरक आहे. दर्जेदार पुस्तके वाचणार तेव्हा मुलांची शक्ती वाढणार. शिक्षण खाते शिक्षकांना वेगवेगळ्या पातळीवर प्रशिक्षण देते, त्याचा लाभ उठवत शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक शक्ती वाढवून गोवा साक्षरतेत अव्वल क्रमांकावर यावा. विद्यार्थ्यांकडे मोठी शक्ती असते त्याला योग्यपध्दतीने दिशा देणे आवश्यक आहे. ते कार्य शिक्षकांनी व पालकांनीही करावे, असे आवाहन केले.

शिक्षणतज्ज्ञ आत्माराम गावकर व मुख्याध्यापक श्रीगणेश गावडे यांनी माझे पुस्तक या उपक्रमाची माहिती देत हा उपक्रम कशासाठी आवश्यक आहे या हे कथन केले. संपूर्ण गोव्यात डिचोली तालुक्यात प्रथम हा उपक्रम सुरू होत असून तो यशस्वी होऊन संपूर्ण गोव्यात राबविण्यात यावा, यासाठी आमचे प्रयत्न आहेत. त्यासाठी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मोलाचे सहकार्य दिले आहे. असे सांगितले.

# करासवाडा 'प्रीमीयर लीग'चे महाकाल वॉरियर्सला विजेतपद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. १९** : करासवाडा–म्हापसा येथील शैलेश ज्ञानेश्वर हरमलकर यांनी त्यांचे दिवंगत बंधू कै. निलेश हरमलकर व कै. सुनिल हमलकर यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या करासवाडा 'प्रीमीयर लीग' परिसरातील संघांपुरती मर्यादित असलेल्या क्रिकेट स्पर्धेचे विजेतपद 'महाकाल वॉरियर्स' संघाला, तर उपविजेतपद राष्ट्रोळी रॉयल संघाला मिळाले.

या स्पर्धेची रोख पारितोषिके शैलेश ज्ञानेश्वर हरमलकर व गोकुळदास ज्ञानेश्वर हरमलकर यांनी पुरस्कृत केली होती. तसेच विजेत्या संघासाठीचा चषक श्वेता नागेश हरमलकर यांनी, तर उपविजेत्या



**करासवाडा–म्हापसा : 'प्रीमीयर लीग' क्रिकेट स्पर्धेचे विजेतपद प्राप्त 'महाकाल वॉरियर्स' संघातील खेळाडू चषकासह.**

संघासाठीचा चषक पार्थ कुंदन हरमलकर यांनी चषक पुरस्कृत केला होता.

प्रारंभी कै. नीलेश हरमलकर व कै. सुनिल हमलकर यांच्या प्रतिमांना त्यांच्या मातोश्री सुलोचना हरमलकर, संजना शैलेश हरमलकर, म्हापशाचे नगरसेवक सुशांत हरमलकर, माजी नगरसेवक सुगंधा हरमलकर आणि ॲड. विकेश हरमलकर यांच्या हस्ते पुष्पांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ गुरुदास हरमलकर यांनी, तर आभार प्रकटन ॲड. विकेश हरमलकर यांनी केले.


# सर्वणमधील घोडेमोडणी मोठ्या उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १९** : येथील सर्वण गावात गावातील प्रसिद्ध घोडेमोडणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. होळी पौर्णिमेच्या दिवशी होळी साजरी केल्यानंतर दुसऱ्या दिवशी राखण्याची होळी झाल्यानंतर चोर हा पारंपरिक खेळ साजरा करण्यासाठी प्रत्येक घरासमोर शबय मागितली जाते, त्यावेळी घरातल्या काही वस्तू ज्यात नारळाच्या वड्या, काळींग शिऱ्या, कणगी आलेल्या लोकाना दिल्या जातात अशा प्रकारे चोर साजरे केले जाते.

तिसऱ्या दिवसा पासून संपूर्ण गावात रोमाट खेळले जाते व होळीच्या पाचव्या दिवशी घोडेमोडणी सर्वण गावात भाटले या परिसरात घोडेमोडणी खेळली जाते. या परिसरात एकुण पाच फेऱ्या होहो वो होव्हा हो हो होव्हा या गजरात व ढोल ताशाच्या गजरात दोन घोडे व गावकर मंडळीतर्फे फेऱ्या मारल्या जातात. यावेळी लग्न झालेलेच घोड़े म्हणून त्याना नेसवले जाते. यावेळी संदेश सोनु सावंत आणि योगेश रायु सावंत याना घोडे नेसण्याचा मान मिळाला होता.

होळीच्या नवव्या दिवशी गावातली कुळदेवी प्रत्येक घरात जाऊन त्याना न्हावण देईल व त्यानंतर सलग पाचदिवस सर्वण, वाठादेव, नायंगिणी, कोळमी धाट, आधार नगर, गोविंद नगर, एकता नगर ह्या परिसरातील घरात. जाऊन घरातल्या मंडळीना न्हावण आणी आशिर्वाद देते. व नंतर कौलोत्सव साजरा करून महाप्रसाद म्हणून पारंपरिक कुळ्थाची पीठी आणी खतखते व उकडा भात अशा जिन्नस महाप्रसाद म्हणून वाढला जातो.




RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 197 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .